## सेमी इंग्रजी

जोशूच्या शाळेत सेमी इंग्रजी सुरू झाले
तेव्हाची ही गोष्ट.
पालकसभेत आईला कळले
आईने बाबांना सांगितले
जोशूच्या शाळेत
आता सेमी इंग्रजी आले.

सेमी इंग्रजीच्या तुकडीत
निवडलेली मुले साठ
शाळेमध्ये त्यांनाच फक्त
टाय-मोजे आणि बंदबूट!

जोशूने आईला विचारले
आमचाच वर्ग वेगळा का?
टाय-मोजे बूट नसतील तर
इंग्रजी येणारच नाही का?

मला मोकळे वाटत नाही
अडकल्यासारखे होते सदा
खेळता-पळता येतही नाही
बुटाचे बंद सुटतात सदा!

जोशू रडरड रडला

तेव्हाच बाबांनी तुकडी बदलून घेतली

पुन्हा जुन्या वर्गात बसल्यावर

जोशूसाहेबांची कळी खुलली!

नंतरचे धोके जोशूला आधीच जाणवले होते.

जोशूला इतरांच्या आधीच शहाणपण आले होते!